(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308


# B.Aadhar


Peer-Reviewed Indexed


Multidisciplinary International Research Journal

**March-2020**

**SPECIAL ISSUE- CCXXIII (223)**





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor :**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor – 7.675

ISSN – 2278-9308

# B.Aadhar

**Multidisciplinary International Research Journal**

## Peer-Reviewed Indexed

**March - 2020**

**SPECIAL ISSUE – CCXXIII 223**

## Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr.Dinesh W.Nichit**
**Editor :**
**Principal**
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

**Aadhar International Publications**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) -7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

# Editorial Board

**Chief Editor -**
**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

**Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**

**Executive-Editors -**

- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage - Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr. Jiro Akita** - Professor Of Economics Tohoku University. Japan
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro., Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande,** Asstt. Professor Dr. P. D. College of Law, Amravati

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**

- **Prof.Virag Gawande Aadhar Publication Amravati 444604**

**Email :** aadharpublication@gmail.com **Website :** www.aadharsocial.com **Mobile : 9595560278**

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

# INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | सतीश तराळांची ग्रामीण कथा : आशय आणि अभिव्यक्ती | डॉ. अलका गायकवाड–लुंगे | 1 |
| 2 | मत्तेची बँकींग क्षेत्रातील उपयुक्तता | डॉ. सौ. संपना आर. वेगीनवार | 5 |
| 3 | बालसं ोपनात पाल ांसमोरी आव्हाने | प्रा. सुषमा जय ु मार फरसोले | 8 |
| 4 | आधुनिकव कौटिलीय कूटनीती आणि जातकीय खत्तिविज्जावादाचे विवेचन | डॉ. ओमकुमार टोम्पे | 11 |
| 5 | काले धन के स्त्रोत प्रभाव एवंनियंत्रण करने के लिए सुझाव–एक अध्ययन | प्रा. डॉ. ए.बी.पटले | 18 |
| 6 | पंचायतराज मधील महिला नेतृत्व व वास्तव | प्रा. गौतम कांबळे | 23 |
| 7 | आदिवासी समाजातील कुमारी मातांची वर्तमान स्थिती | प्रा. डॉ. श्रीराम खाडे | 26 |
| 8 | अर्थव्यवस्थेच्या विकासात सरकारची भूमिका | डॉ. प्रदीप दरवरे | 31 |
| 9 | महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसा याबाबतचे विचार | प्रा. डॉ. सुभाष के. पवार | 35 |
| 10 | महात्मा गांधी का दृष्टिकोण एवं प्रबन्धकीय कौशल | डॉ. मधुलता व्यास | 39 |
| 11 | महात्मा फुले यांच्या दृष्टिकोनातुन वंचितांचा इतिहास –एक मिमांसा | फकिरा भगवान राजगुरू | 43 |
| 12 | महिला व बालक हक्क अधिकार कायदा व सुव्यवस्था टिकात्मक परीक्षण | प्रा. डॉ. निना सा. चवरे | 50 |
| 13 | कामायनी महाकाव्य की प्रासंगिकता | विक्रम बालकृष्ण वारंग | 55 |
| 14 | किसान क्रेडिट कार्ड योजना : एक अध्ययन | प्रा.डॉ.शालिनी ` .पांडे | 60 |
| 15 | महात्मा जोतीराव फुले व समकालीन समाजसुधारक पंडिता रमाबाई | प्रा. डॉ. सुनिल चवळे | 64 |

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) -7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**


| | | |
|---|---|---|
| 16 | मुद्रा योजनेची कामगिरी<br>महाजन संजय बाबुराव | 67 |
| 17 | वित्तीय बाजारपेठा आणि वित्तीय संस्था यामधील समन्वय<br>प्रा.डॉ. संजय उ. उल्हे | 80 |
| 18 | Digital Profiling As A Threat To Democracy **Dr. Jyoti D. Thakare** | 82 |
| 19 | Impact of Nature on Occupation Structure of Tribal Population in Chikhaldara Tahsil of Amravati District (Maharashtra State)<br>**Dr. Aruna P. Patil** | 85 |
| 20 | Gender Justice In Modern India **Dr. Suprabha P. Yadgirwar** | 92 |
| 21 | Assessment of Temporal Change in Crop Cultivation of Southern AhmednagarDistrict : A Case Study of Shrigonda Tahsil<br>**Dhawale Ganesh, Devne Manojkumar, Mundhe Nitin** | 97 |
| 22 | Historical And Social Traumas In Toni Morrison's Beloved<br>**Dr. A. Chandramouly,** | 103 |
| 23 | An Analytical Study of GST **S. P. Rathod** | 106 |
| 24 | Implementation of New Syllabus of Compulsory English for B. A. III in Gondwana University, Gadchiroli **Dr. Dayanand R. Mane** | 111 |
| 25 | Mental Health Status of Married Working Woman in India<br>**Rekha Shriramji Nimbhorkar, Yawalikar** | 115 |
| 26 | A study of Impact of Demonetization on the growth of Mutual Fund industry Sector in India **Dr. B.M.Chachane** | 118 |
| 27 | Exploration of Personality Traits in Kamala Das's Poetic Works<br>**Dr. G.O. Jondhalekar** | 126 |
| 28 | Role of Indian Banks in Maintaining Ecological Balance<br>**Dr. Sanjay Uddhavrao Deshmukh** | 130 |
| 29 | Documentation on Some Ethnic Plant Species of Darwha Region Dist. Yavatmal (M.S.) India **Chavhan V. N.** | 134 |
| 30 | Contribution of Yoga to Sports **Dr. Purnima Giri Kapta** | 139 |
| 31 | The Role Of Micro, Small And Medium Scale Industries In Development Of Aurangabad **Dr. Vaibhav Popatrao Kawade** | 143 |
| 32 | Academic and Administrative Audit: Need for quality improvement in HEI's **Dr. KalpanaVajpeyi** | 147 |

| | | |
|---|---|---|
| 33 | श्री नागदेवचार्य जीवन व कार्य<br>प्रा. डॉ. कल्पना त्र्य. मेहेरे | 149 |
| 34 | व्यंकटेश माडगूळकरांच्या तरल कथादृष्टीचा आविष्कार : 'उंबरठा'<br>प्रा.छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 153 |
| 35 | आदिवासींच्या जीवनावर धर्मव्यवस्थेचा झालेला परिणाम<br>डॉ. निलिमा वाय. भोगे | 156 |
| 36 | संसदीय लोकशाहीसंबंधी डॉ. आंबेडकरांचे विचार<br>प्रा. डॉ. दिपाली श्रीराम घोगरे | 161 |
| 37 | महिलांवर होणाऱ्या कुटुंबांतर्गत अत्याचाराचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>प्रा. रविन्द्र सदाशिव बर्वे | 163 |

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

# संसदीय लोकशाहीसंबंधी डॉ. आंबेडकरांचे विचार

प्रा. डॉ. दिपाली श्रीराम घोगरे
डॉ.एच.एन.सिन्हा कला व वाणिज्य महाविद्यालय पातूर
Email – prdipalighogare@gmail.com

डॉ. आंबेडकर लोकशाहीचे कट्टर समर्थक होते. आंबेडकरांच्या राजकीय चिंतनातील लोकशाही विचार हा केवळ आदर्शाच्या स्वप्नरंजातुन आलेला नव्हता तर भोवतालच्या राजकीय सामाजिक वास्तवातून निर्माण झालेला होता. सामान्य माणसावर त्यांचा एवढा लोभ व विश्वास होता की त्यांच्या व्यक्तीगत व सामूहिक प्रतिष्ठेच्या प्रतिष्ठापणेसाठी लोकशाही जीवनमार्गाचा त्यांनी ध्यास घेतलात्र जुलूम, जातीयता व गुलामगिरीतून सामान्य माणसाला लोकशाहच मुक्त करू शकते असे त्यांचे मत होते. परंतु जेव्हा संसदीय लोकशाही विषयी आपण डॉ. आंबेडकरांचे विचार पाहतो तेव्हा सुरवातीच्या काळात त्यांनी संसदीय लोकशाही अमान्य केली होती.

१७ सप्टेंबर १९४३ रोजी दिल्ली येथे केलेल्या भाषणात डॉ. आंबेडकरांनी भारतीय जनतेस असा इशारा दिला की, 'सावधान! संसंदीय लोकशाहीपासून सावधान ! संसदीय लोकशाही जशी चांगली दिसते तशी ती प्रत्यक्षात नाही' संसदीय लोकशाहीतुन बहुसंख्याक जातीगटाचे वर्चस्व प्रस्थापित होण्याची व अल्पसंख्य गटाला त्याचा कायम जाच होण्याची भिती त्यांना वाटत होती. म्हणून अध्यक्षीय लोकशाही भारताला उपयुक्त ठरेल असे आंबेडकरांना वाटत होते. पुढे मात्र त्यांनी आपली ही भूमिका बदलली. १९५० साली त्यांनी जी घटना लिहिली ती संसदीय लोकशाहीचीच. याहीपुढे जानून त्यांनी संसदीय लोकशाहीची तारीफ केली ही एक ठळक विसंगती आहे.

संसदीय लोकशाही भारताला अयोग्य कशी याची कारणमिमांसा करतांना डॉ. आंबेडकर म्हणतात संसदीय लोकशाहीच्या अपयशामागे दोन मुळ कारणे आहेत. एक चुकीची तत्वप्रणाली आणि दुसरे चुकीचे संघटन. चुकीच्या तत्वप्रणालीपैकी एक म्हणजे कराराचे स्वातंत्र्य, सांसदीय लोकशाहीने या कराराच्या स्वातंत्र्यातून व आर्थिक विषमतेतून निर्माण होणाऱ्या परिणामाकडे लक्ष दिले नाही. तिने राजकीय स्वातंत्र्यावर भर दिला पण गरीबाच्या प्रश्नांकडे वा त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याकडे कधी लक्ष दिले नाही.

संसदीय लोकशाहीवरील त्यांचा हा आक्षेप लक्षात घेतला तर संसदीय लोकशाही म्हणजे, राज्यशास्त्रात जिला पाश्चात्य लोकशाही किंवा भांडवलशाही लोकशाही म्हणतात ती अभिप्रेत असावी. ज्या काळात त्यांनी संसदीय लोकशाहीवर टिका केली त्याच काळात जगात अनेक उदारवादीही संसदीय लोकशाहीकडे संशयाने पाहू लागले होते. याला कारण म्हणजे १९१७ च्या रशियन क्रांतीने या लोकशाहीला प्रचंड तडाखा दिला. रशियन क्रांतीने भांडवलशाही लोकशाहीवर सैध्दांतिक व व्यवहारिक पातळीवरून हल्ला चढवला. डॉ. आंबेडकरांची संसदीय लोकशाहीवरील टिका लक्षात घेताना हा जागतिक संदर्भही दुर्लक्षिता कामा नये.

**संसदीय लोकशाहीतील दोष :–**

शासनपध्दती भारतात राबवतांना येणाऱ्या अडचणीची त्यांना जाणीव होती. त्या खालील प्रमाणे.

**१) सामाजिक व आर्थिक विषमता :–**

डॉ. आंबेडकरांच्या मतेज्या समाजात सामाजिक व आर्थिक विषमता असते त्या समाजात संसदीय लोकशाही अपयशी ठरते आणि भारतात ही विषमता प्रचंड असल्याने भारतात हा शासन प्रकार अपशयी ठरेल याची त्यांना भिती होती.

**२) संथ शासन :–**

संसदीय शासन पध्दतीत चर्चेद्वारे निर्णय घेतले जातात. त्यामुळे शासनाचे कार्य मंदगतीने चालते. जनतेची कामे त्वरीत न झाल्याने असंतोष वाढतो.

**३) जातीय राजकारण :–**

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

डॉ. आंबेडकरांच्या मते, भारतीय समाज जातीवर आधारित असल्याने भारतात ज्या जातीची संख्या जास्त त्यांच्यान हाती सत्ता केंद्रीत होईल. कारण मतदान जातीय दृष्टीकोनातून होईल व त्यामुळे अल्पसंख्यांक जातीवर सक्ती व जुलूम होईल. त्यामुळे राजकारणाचे जातीय स्वरूप संसदीय लोकशाहीला पूरक नाही असे त्यांचे मत होते.

**४) सामाजिक व आर्थिक लोकशाहीकडे दुर्लक्ष :—**

संसदीय लोकशाहीत राजकीय अधिकारांवरच अधिक भर असतो. सामाजिक व आर्थिक प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जाते आणि भारतात जर सामाजिक लोकशाहीची स्थापना झाली नाही तर राजकीय लोकशाही कुचकामी ठरेल ह्याची डॉ. आंबेडकरांना जाणीव होती.

**संसदीय लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक घटक :—**

डॉ. आंबेडकरांनी इंग्लंडमधील लोकशाहीचे यश प्रत्यक्ष अभ्यासले होते. त्यामुळे भारतीय लोकशाहीच्या मार्गातील संभाव्य धोक्यांचा इशारा त्यांनी भारतीयांना दिला. पण त्यांचबरोबर जेव्हा त्यांना भारतासाठी हाच शासन प्रकार योग्य मानला तेव्हा त्यासाठी खालील गोष्टी आवश्यक ठरवल्या.

१) समाजात प्रत्येक व्यक्तीला समान सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा मिळेल असे वातावरण तयार झाले पाहिजे.

२) सर्वांच्या किमान गरजा भागवल्या जातील अशी आर्थिक व्यवस्था निर्माण केली पाहिजे. प्रत्येकाला कायद्याचे समान संरक्षण मिळावे व प्रत्येकाने संवैधानिक नीतीमत्तेचे कसोशीने पालन करावे. त्याकरीता व्यक्तीपुजेची प्रवृत्ती नष्ट होणे गरजेचे आहे.

३) किमान दोन राजकीय पक्ष असलेली पक्षपध्दती व प्रबळ विरोध पक्षाचे अस्तित्व भारतात संसदीय लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

४) स्त्री स्वातंत्र्याची जोपासना व सामाजिक एकता व बंधूता आत्मसात केली तरच भारतात संसदीय लोकशाही यशस्वी होवू शकते असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

वील विवेचन पाहिल्यानंतर १९४३ साली डॉ. आंबेडकरांनी जेव्हा संसदीय लोकशाही विरूध्द भारतीय जनतेस सावधगिरीचा इशारा दिला तेव्हा त्यांच्या मुळाशी बाजारपेठी समाज हे कारण होते. पण व्यक्तीचया अंगी उपक्रमशील, आत्मनिर्भरता व जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याची क्षमता संसदीय शासनांतच आहे. शिस्त, प्रामाणिकपणा, सहकार्य, धाडस इ. माध्यमातून व्यक्ती विकासाचा मार्ग ही पध्दतीच खुला करू शकते व हुकूमशाहीला आळा घालून सामाजिक व आर्थिक क्षेत्रात प्रगती घडवून आणू शकते याची जेव्हा त्यांना खात्री पटली तेव्हा त्यात काही सुधारणांचा इशारा करून १९५० ला त्यांनी भारतासाठी संसदीय शासन पध्दती स्विकारली.

**संदर्भसूची :—**

१) डॉ. लिंबाडे शरणकुमार — प्रज्ञासुर्य — दिलीपराज प्रकाशन,पुणे.
२) डॉ. देगावकर ए.जी.—राजकीय विचारवंत, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर.
३) डॉ. भोळे भा. ल. — भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापूरे बुक डिस्ट्रिब्युटर्स नागपूर.
४) प्रा. हाशम शेख, प्रा. पाटील अरविंद, प्रा. देशमुख कमलाकर — भारतीय आणि पाश्चिमात्य रा. विचारवंत — विश्व पब्लिशर अॅन्ड डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर.